# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:- १७ फेब्रुवारी,२०२२

जळगाव दि.१७ (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या आजीवन व अध्ययन व विस्तार विभागद्वारे ‘कवयित्री बहिणाबाई चौधरी’ यांच्या नावाने ऑनलाईन पध्दतीने दर महिन्याला व्याख्यानमाला सुरू करण्यात येत असून शुक्रवार दि. १८ फेब्रुवारी रोजी सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीष प्रभुणे यांचे व्याख्यान होणार आहे.

या व्याख्यानमालेत शिक्षण, कला, क्रीडा, साहित्य, स्पर्धा परीक्षा, समाजकारण, राजकारण, सांस्कृतीक, भारतीय प्रशासन सेवेतील विविध अधिकारी, ज्येष्ठ नागरिक, अर्थकारण व महिलांच्या समस्यां अशा विविध विषयांवर समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवरांना आमंत्रित केले जाणार आहे.

शुक्रवार दि.१८ फेब्रुवारी, २०२२ रोजी दुपारी ४ वाजता व्याख्यानमालेचे प्रथम पुष्प पद्मश्री पुरस्कार प्राप्त पुणे येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री.गिरीष प्रभुणे हे ऑनलाईन पध्दतीने गुंफणार आहेत. ‘भारताच्या उभारणीत भटके विमुक्तांचे योगदान’ या विषयावर ते बोलणार आहेत. झुम-लिंक, युट्युब, फेसबुक वर व्याख्यान ऐकता येईल. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व्याख्यानाची लिंक उपलब्ध करून देण्यात येणार आहे. व्याख्यानमालेस ऑनलाईन उपस्थित राहण्याचे आवाहन आजीवन व अध्ययन व विस्तार विभागाचे प्रभारी संचालक प्रा.मनिष जोशी यांनी केले आहे.

---

प्रति,

मा. संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

आपल्या लोकप्रिय दैनिकातून उपरोक्त बातमी प्रसिद्ध करावी, ही विनंती.

**आपला विश्वासू**

जनसंपर्क अधिकारी करीता